E:\Sand Auction/DSR Letter-2019-20.doc

# बुलडाणा जिल्हयाचा जिल्हा सर्वेक्षण अहवाल गौण खनिजाबाबत तयार करण्याकरीता दरपत्रक मागविणेबाबत

क्र.कावि/कक्ष खनिकर्म/ ७६ /२०२०
जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा
दिनांक :- २२ जानेवारी, २०२०

संदर्भ :- १) केंद्र शासनाच्या पर्यावरण,वने व वातावरणीय बदल मंत्रालयाची अधिसूचना क्र.एस.ओ. १४१ ई दिनांक १५/०१/२०१६

२) केंद्र शासनाच्या पर्यावरण,वने व वातावरणीय बदल मंत्रालयाची अधिसूचना क्र.एस.ओ. ३६११ आ, दिनांक २५/७/२०१८

३) शासन,महसूल व वन विभाग निर्णय क्र.गौखनि-१०/०२१९/प्र.क्र.९/ख-१, दि.०३/०९/२०१९

***

केंद्र शासनाच्या पर्यावरण,वने व वातावरणीय बदल मंत्रालयाची संदर्भ क्र.०१ अधिसूचना दिनांक १५/०१/२०१६ परिच्छेद ७ (iii) व परिशिष्ट -१० अन्वये व संदर्भ क्र.०२ अधिसूचना दिनांक २५/७/२०१८ नुसार वाळु/रेती निर्गतीकरीता नदीपात्रातील वाळु उत्खनन (पर्यावरण अनुमती घेणे ) आणि लघु गौण खनिजाचे उत्खनन तसेच गौणखनिजाचे खाणपट्टे मंजूर करण्यासाठी जिल्हा सर्वेक्षण अहवाल (District Survey Report) तयार करणे आवश्यक करण्यात आलेले आहे. तसेच केंद्र शासनाच्या MOEF & CC मंत्रालयाने तसेच राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा सर्वेक्षण अहवाल (District Survey Report) तयार करणे आवश्यक आहे. जिल्हा सर्वेक्षण अहवाल (District Survey Report) तयार करण्यासाठीचा खर्च जिल्हा खनिज विकास प्रतिष्ठानसाठी गठीत करण्यात आलेल्या विनियमन परिषदे (Governing Council) मध्ये मंजूर झाल्यानंतर अदा करण्यात येईल.

सबब बुलडाणा जिल्हयाचा जिल्हा सर्वेक्षण अहवाल (District Survey Report) तयार करण्याचे अनुषंगाने आवश्यक असलेल्या बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

१. जिल्हयात उपलब्ध असलेल्या खाणी
२. सदर खाणीचे क्षेत्र
३. खाण समाप्ती कालावधी व खाणीची यादी
४. मागील तीन वर्षात प्राप्त स्वॉमित्वधनाची माहिती
५. मागील तीन वर्षात रेतीघाटापासून प्राप्त स्वॉमित्वधनाची माहिती
६. जिल्हयातील नदीतळात जमा होणा-या प्रक्रियेबाबत
७. जिल्हयाची सर्वसाधारण माहिती
८. जिल्हयातील उपयोगातील जमीन बाबतचे प्रकार — वन,कृषी,उद्यान,, कृषी व उत्खनन इत्यादी
९. जिल्हयाची भु-भौगोलिक रचनेची माहिती
१०. जिल्हयातील होणा-या पर्जन्यमानाबाबत माहेवार माहिती
११. जिल्हयात भुर्गभात प्राप्त होणा-या गौण खनिजाची माहिती

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने बुलडाणा जिल्हयातील वाळु/रेतीची निर्गती करण्याकरीता तसेच जिल्हयातील व्यक्तींना खाजगी जमिनीमधुन गौणखनिजाचे उत्खनन करण्याकरीता खाणपट्टे मंजूर करण्यासाठी जिल्हयाचा जिल्हा सर्वेक्षण अहवाल (District Survey Report) तयार करण्याकामी पर्यावरणाशी व गौण खनिजाशी निगडीत मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार (Accredited Environmental Consultant) असलेल्या तांत्रिक खाजगी व्यक्ती /एजन्सीज यांचेकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

सबब, पर्यावरणाशी व गौण खनिजाशी निगडीत तांत्रिक खाजगी व्यक्ती /एजन्सीजने जिल्हयाचा जिल्हा सर्वेक्षण अहवाल (District Survey Report) तयार करण्यासाठीच्या दरपत्रकाचा सिलबंद लिफाफा दिनांक:- ०३ /०२/२०२० पावेतो खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय,बुलडाणा येथील पेटीमध्ये टाकावा. विहीत दिनांकानंतर आलेल्या सिलबंद लिफाफाच्या विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर दरपत्रक मागविण्याबाबतचे जाहीर प्रगटन वेबसाईट क्र. www.buldhana.nic.in वर तसेच वृत्तपत्रातही प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

अपर जिल्हाधिकारी
बुलडाणा